मराठी विभाग

जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने

# ‘वि. म. लोहिया कर्णबधीर शाळेस अभ्यास भेट’

"Education for Knowledge, Science, and Culture"
- Shikshanmaharshi Dr. Bapuji Salunkhe

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

# Vivekanand College, Kolhapur (Autonomous)

KOLHAPUR (AUTONOMOUS)

**2022-23**

## *Report: Karnabadhir Vidyalay Visit*

**1. Name of Department** : **Marathi**

**2. Name of Organized Activity** : Field Visit (***Karnabadhir Vidyalay***)

**3. Date/ Duration** : 23/09/2022

**4. Aims and Objectives** : 1. To make aware of the problems of deaf students.

2. To develop social consciousness among students.

**5. No. of beneficiaries** : **Total = 22**

| | | |
|---|---|---|
| Teachers | Male | 03 |
| Students | Male | 06 |
| | Female | 17 |

**6. Expenditure & funding agency** : Nil

**7. Brief description** : On the occasion of World Sign Language Day, the students of Marathi Department of Vivekananda College visited V M Lohia Karnbadhir Vidyalaya Kolhapur and explained the method of education of deaf children. Also, fruits and food were distributed to school children on this occasion.

**8. Outcomes** : 1. Realized the problem of deaf students.

2. Social consciousness developed among college students.

**9. Photos** : Enclosed

**10. Signatures of coordinator/ organizer**: Dr. Pradip Yashwant Patil

College Recog. No. U.S.C. 1074/R 1/D1 8.8.1976
College Code No. 23.09.002
College U Dise No. 27341301006

"ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षण प्रसार"
शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

Estd. June 1964



Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**VIVEKANAND COLLEGE, KOLHAPUR (AUTONOMOUS)**

2130 'E' Tarabai Park, Kolhapur, Tal. Karveer, Dist. Kolhapur 416003
Affiliated to Shivaji University, Kolhapur (M.S.)
NAAC Reaccredited : "A" (CGPA 3.24)
College with Potential for Excellence by U.G.C., New Delhi
"Star College" by D.B.T. Govt. of India
ISO 9001 : 2015

(स्वायत्त) कोल्हापूर

Ph. : 0231-2658612, 2658840 | Fax : 0231-2658840 | Resi. : 0231-2653962 | Website : www.vivekanandcollege.org | E-mail : info@vivekanandcollege.org

| Founder | President | Chairman | Secretary | Principal |
| --- | --- | --- | --- | --- |
| Dr. Bapuji Salunkhe D.Litt | Hon. Chandrakant Dada Patil MLA | Prin. Abhaykumar Salunkhe M.A. | Prin. Mrs. Shubhangi Gavade M.Sc., B.Ed. | Dr. R. R. Kumbhar M.Sc. M.Phil. Ph.D. |

Ref. No. VCK 1141/2022-23

Date 27/9/2022

To,
The Headmaster,
Vinay Kumar Madanmohan Lohia
Mook Badhir Vidyalaya (School for Deaf and Dumb)
Kolhapur.

Sub: To know all about **Sign Language and Sign Language Interpreters** in the School for Deaf and Dumb

Respected Sir,

**Happy International Day of Sign Languages**-23rd September 2022!

Let's celebrate the day with the theme, "**Sign Language Unite Us**"

On occasion of International Day of Sign Languages, some of the students of B.A. intend to visit your vidyalaya to raise awareness how people who are dumb and deaf use sign languages to communicate and contribute to their communities. They are curious to learn how sign language interpretation enhances the accessibility at school and at works.

So kindly consider and let them know "**Sign Languages Are for Everybody**".

Looking forward to receive your co-operation and support.

With warm regards.

Dr. R. R. Kumbhar
**PRINCIPAL**
Vivekanand College,
Kolhapur.

Shri Swami Vivekanand Shikshan Sanstha's

**VIVEKANAND COLLEGE, (AUTONOMOUS) KOLHAPUR**

**Department of English**

**Celebration of International Day of Sign Languages**

23rd September 2022

## VISIT TO MOOK BADHIR VIDYALAYA (SCHOOL FOR DEAF AND DUMB)

**ATTENDANCE**

| Sr. No | Name of the Student | Class | Signature |
|---|---|---|---|
| 1 | सुरेखा अशोक लाखे | B A I | S.A.Lakhe |
| 2. | श्रेया म्हातारु मांडेकर | BA I | Mandekar |
| 3. | शब्दा बालाजी वागमोडे | BA I | SBW |
| 4. | तृप्ती अनिल कुंभार | BA I. | Akumbhar |
| 5. | हर्षदा जगन्नाथ काळे | B.A.II | Kale |
| 6. | धनश्री जनार्दन शिंदे | B.A. II | D.J.shinde |
| 7. | शाहिन फिरोज पठाण | B.A. II | [signature] |
| 8. | स्वप्निल बाबुराव काशिद | B.A.F.Y. | [signature] |
| 9. | सुजल खंडू भिवरकर | B.A.F.Y | [signature] |
| 10. | गुलनाज मोसिनखान पठाण | B.A.S.Y | Pathan |
| 11 | सानिया अस्लम पठाण | B.A S.Y | Pathan |
| 12 | तेजस आजोज दाभाडे | B.A.I | [signature] |
| 13 | वैभव विठ्ठल मालेकर | B.A.I | [signature] |
| 14 | जयेश संजय चव्हाण | B.A. I | [signature] |
| 15 | प्रतिक्षा पोवार | B.A III | [signature] |
| 16. | समृद्धी चव्हाण | B.A III | Samruddhi |
| 17 | ऐश्वर्या गवसे | B.A. III | Gavase |
| 18. | सानिका पाटील | BA III | Sanika |
| 19. | किर्ती जाधव | B.A.III | Kjadhav |
| 20 | यामिनी जाधव | B.A.III | [signature] |
| 21 | सुश्मिता चौगुले | B.A.III | [signature] |
| 22 | केदार गुरव | B.A.III | केदार गुरव |
| 23 | तेजश्री चौगुले | B.A.III | Tejashri |
| 24 | | | |

[signature]

मराठी विभाग प्रमुख
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

17 + 6

**"विवेकानंदच्या विद्यार्थ्यांची लोहिया मूककर्णबधिर शाळेस अभ्यास भेट"**

कोल्हापूर : 4 : येथील विवेकानंद महाविद्यालयातील बी.ए. १ च्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने वि. म. लोहिया कर्णबधिर विद्यालय, कोल्हापूर येथे भेट दिली. याप्रसंगी विद्यालयातील विविध वर्गात विद्यार्थ्यांनी जाऊन अध्ययन व अध्यापन पद्धतीच्या संदर्भात माहिती घेतली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या वतीने फळे व खाऊ वाटप करण्यात आले. या अभ्यास भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

कर्णबधिर मुलांनी आयुष्यात कोणत्याही प्रकारे खचून न जाता आपल्या व्यंगावर मात करून शिकण्याची जिद्द त्यांच्या एकूण वर्तनातून दिसून आली. ही मुलं तर शिकत होतीच, पण कौतुक करायला हवे ते येथील शिकवणाऱ्या शिक्षकांचे. या शिक्षकांनी कष्ट करून हा विद्यार्थी बोलला पाहिजे, त्याला अक्षरांची, चित्रांची, वस्तूंची ओळख व्हायला हवी यासाठीचे त्यांचे प्रयत्न खूप महत्वाचे आहेत.

याप्रसंगी या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राऊत यांनी संस्थेची, विद्यालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सहशिक्षक, यादव मॅडम, कांबळे मॅडम, पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी डॉ. प्रदीप पाटील यांनी मुख्याध्यापक, शिक्षकांचे आभार मानले. या अभ्यासभेटीसाठी डॉ. स्वप्निल बुचडे, डॉ. दादासाहेब घाडगे व २५ विद्यार्थी उपस्थित होते. या अभ्यासभेटीचे नियोजन डॉ. प्रभा पाटील यांनी केले.

---

**विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत)**

जा.क्र.व्हीसीके/ मेलव्दारे/-2022-23 दि 04.10.2022

प्रति,
मा. संपादकसो,
दैनिक ------------------कोल्हापूर.

महोदय,
वरील बातमी आपल्या लोकप्रिय दैनिकात फोटोसह प्रसिद्ध करुन सहकार्य करावे ही विनंती.
कळावे,

आपला विश्वासू,

प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार

प्राचार्य
विवेकानंद कॉलेज
कोल्हापूर

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यांसाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

## विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## मराठी विभाग

## जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने

**'कर्णबधीर शाळेस अभ्यास भेट'**

शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२

सकाळी ११.०० वाजता

**बातमी (दै. पुढारी, १०/१०/२०२२)**

# 'विवेकानंद'च्या विद्यार्थ्यांची लोहिया कर्णबधिर शाळेस भेट

**कोल्हापूर :** विवेकानंद महाविद्यालयातील बी.ए. १ च्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने वि. म. लोहिया कर्णबधिर विद्यालयास भेट दिली. यावेळी विद्यार्थ्यांनी अध्ययन व अध्यापन पद्धतीच्या संदर्भात माहिती घेतली. शाळेतील विद्यार्थ्यांना फळे व खाऊचे वाटप करण्यात आले. मुख्याध्यापकांनी संस्था, विद्यालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. डॉ. प्रदीप पाटील यांनी आभार मानले. अभ्यासभेटीत डॉ. स्वप्निल बुचडे, डॉ. दादासाहेब घाडगे यांच्यासह २५ विद्यार्थी सहभागी झाले होते. अभ्यासभेटीचे नियोजन डॉ. प्रभा पाटील यांनी केले.

विभागप्रमुख

मराठी विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## मराठी विभाग

## जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने

**'कर्णबधीर शाळेस अभ्यास भेट'**

शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२

सकाळी ११.०० वाजता




वि. म. लोहिया कर्णबधीर शाळेस भेट



कर्णबधीर शाळेतील विद्यार्थ्यांशी संवाद



आभार – डॉ. प्रदीप पाटील



वि. म. लोहिया कर्णबधीर विद्यार्थ्यांना खावू वाटप.

डॉ. स्वप्निल बुचडे

डॉ. प्रदीप पाटील

प्रा. डॉ. एकनाथ आळवेकर (विभागप्रमुख)

मराठी विभाग प्रमुख
विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

# एक अविस्मरणीय अनुभव....

श्रेया मांडेकर

दिनांक ३ ऑक्टोबर ला 11:30 च्या सुमारास आम्ही सर्वजण 'वि. ह. लोहिया ~~पद्मसेन हायस्कूलला~~' भेट देण्यासाठी म्हणून गेलो. तिथे गेल्यानंतर तिथलं ते वातावरण पाहून खरंच खूप छान वाटल. म्हणजे असं जाणवलच नाही की ही मुल आमच्यापेक्षा वेगळी आहेत. त्यांनी मुकात तसं जाणवू दिलच नाही. ती इतकी ~~खू~~ आनंदी दिसायची, शिकताना किती एकाग्रतेने शिकायची हे पाहून मी तर थक्क झाले. देवाने त्यांना एक इंद्रिय कमी दिलंय हे त्यानाही माहिती आहे. पण या गोष्टीचा त्यांनी त्यांच्यावर काहीच परिणाम पडू दिला नाही; असं त्यांच्याकडे बघितल्यावर जाणवत होत. त्या शाळेत प्रवेश केल्यापासून माझं लक्ष तेथील प्रत्येक वस्तू वेधून घेत होती. पायऱ्यांवरून जाताना त्यावर असणारे अंक, ~~ब अ ब~~ जेणेकरून मुलांना अंक समजावणे सोपे होईल हा हेतू असावा. त्यानंतर आम्ही सात सात विद्यार्थी मिळून एका एका वर्गात गेलो व ते नक्की कसे शिकतात हे जाणून घेण्याचा प्रयत्न केला.

एका वर्गात सात ~~सात~~ विद्यार्थी होते. त्यांच्या बसण्याची व्यवस्थाही अर्धगोल पद्धतीने केली होती. या मागील उद्देश कदाचित प्रत्येक विद्यार्थ्याकडे सारखे लक्ष देणे हा असावा. प्रत्येक गोष्ट अगदी विचारपूर्वकतेने मांडली होती. वर्गशिक्षकांची शिकविण्याची पद्धतही खूप छान वाटली. ते मुलांना खूप छान प्रकारे समजावून सांगत होते. वर्गात अनेक प्रकारचे तक्ते, कात्रणे, मॉडेल्स बनविलेले होते ज्याद्वारे त्यांना ते शिकवायचे इतकेच नाही तर त्यांच्याकरिता हेडफोन सुध्दा उपलब्ध करून दिले होते. लहान मुलांना बोलून दाखवलेले जितक्या लवकर समजत नाही तितके चित्रातून समजते. याकरिता त्यांनी मुलांना डिजिटल पद्धतीने शिक्षण दिले जात

होते आणि प्रत्येक वर्गात प्रवेश केल्यानंतर ती मुले आम्हाला अगदी आदराने नीट करत होती. शिक्षकांनी विचारलेल्या प्रश्नांची उत्तरे देत होती काही जणांना नीट बोलताही येत नसायचे पण तरिही ते बोलण्याचा प्रयत्न करायचे. मला त्यांच या बाबतीत खूप अप्रूप वाटल.

आणि सर्वात जास्त कौतुक शिक्षकांच वाटल कारण ते त्या मुलाला इतक्या छान प्रकारे समजवत होते. त्यांच्याशी कम्युनिकेट करत होते एकंदरित ते त्यांच्यापरीने खूप प्रयत्नशीलपणे शिकवत होते

आज तेथून परत येताना मात्र मला बऱ्याच नवीन गोष्टी समजल्या. त्यांना भेटण्यापूर्वीची "मी" आणि नंतरची मी यात खूप फरक जाणवला तिथे जाण्याआधी मला माझ्यासारखी बदनसीब कोणीच नाही असं वाटायचं पण जेव्हा या मुलांना मी भेटली तेव्हा माझा हा गैरसमज पूर्णपणे दूर झाला. त्यांच्याकडे बघून मला माझं दुःख काहिच नाही वाटल. त्या मुलांकडे एखाद्याची क्षमता नसूनही त्यांना त्याच दुःख वाटत नव्हत. उलट ते नेहमी हसतमुख दिसायचे. मला ही गोष्ट मात्र समजली की आयुष्यात कितीही संकट आली मग ती छोटी असोत वा मोठी त्याचा सामना हसतमुखाने करता आला पाहिजे

ही एक मोलाची शिकवण मला त्यादिवशी मिळाली.

'ज्ञान, विज्ञान आणि सुसंस्कार यासाठी शिक्षणप्रसार'

– शिक्षणमहर्षी डॉ. बापूजी साळुंखे

श्री स्वामी विवेकानंद शिक्षण संस्था, कोल्हापूर संचालित

# विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)

## मराठी विभाग

## जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने

### 'कर्णबधीर शाळेस अभ्यास भेट'

**शुक्रवार, २३ सप्टेंबर, २०२२**

**सकाळी ११.०० वाजता**

### अहवाल

विवेकानंद महाविद्यालयातील बी.ए. १ च्या विद्यार्थ्यांसह प्राध्यापकांनी जागतिक हावभाव भाषा दिनाच्या निमित्ताने वि. म. लोहिया कर्णबधिर विद्यालय, कोल्हापूर येथे भेट दिली. याप्रसंगी विद्यालयातील विविध वर्गात विद्यार्थ्यांनी जाऊन अध्ययन व अध्यापन पद्धतीच्या संदर्भात माहिती घेतली. याप्रसंगी शाळेतील विद्यार्थ्यांना महाविद्यालयाच्या प्राध्यापकांच्या वतीने फळे व खाऊ वाटप करण्यात आले. या अभ्यास भेटीसाठी महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. आर. आर. कुंभार यांचे मार्गदर्शन लाभले.

कर्णबधिर मुलांची आयुष्यात कोणत्याही प्रकारे खचून न जाता आपल्या व्यंगावर मात करून शिकण्याची जिद्द त्यांच्या एकूण वर्तनातून दिसून आली. ही मुलं तर शिकत होतीच, पण कौतुक करायला हवे ते येथील शिकवणाऱ्या शिक्षकांचे. या शिक्षकांनी कष्ट करून हा विद्यार्थी बोलला पाहिजे, त्याला अक्षरांची, चित्रांची, वस्तूंची ओळख व्हायला हवी यासाठीचे त्यांचे प्रयत्न खूप महत्वाचे आहेत.

याप्रसंगी या विद्यालयाचे मुख्याध्यापक श्री. राऊत यांनी संस्थेची, विद्यालयाची माहिती विद्यार्थ्यांना दिली. सहशिक्षक, यादव मॅडम, कांबळे मॅडम, पाटील मॅडम यांनी विद्यार्थ्यांच्या शंकांचे निरसन केले. यावेळी डॉ. प्रदीप पाटील यांनी मुख्याध्यापक, शिक्षकांचे आभार मानले. या अभ्यासभेटीसाठी डॉ. स्वप्निल बुचडे, डॉ. दादासाहेब घाडगे व २५ विद्यार्थी उपस्थित होते. या अभ्यासभेटीचे नियोजन डॉ. एकनाथ आळवेकर यांनी केले.

विभागप्रमुख

(प्रा. डॉ. ई. बी. आळवेकर)

मराठी विभाग प्रमुख

विवेकानंद कॉलेज, कोल्हापूर (स्वायत्त)